सं.फौ.ख.क्र. १९६१४/२०२६
सरकार विरुध्द नितेश
निशाणी क्रमांक– ९ लगत

## आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे जबाब

आरोपीचे नांवः नितेश देविदास शिवशेटे, **वयः** सज्ञान,
**राहणारः** हिंगणी, ता. बिलेली हिंगणी, जि. नांदेड, पुणे.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र.१ | : | मी आता तुम्हाला जे प्रश्न विचारणार आहे, त्याचे उत्तर देणे कायद्याने तुमचे वर बंधनकारक नाही, तुम्ही उत्तर दिल्यास त्याचा तुमचे विरुध्द उपयोग होऊ शकतो, हे तुम्हाला समजले काय ? |
| उत्तर– | : | होय |
| प्रश्न क्र.२ | : | तुम्ही अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेला साक्षीपुरावा ऐकला का? व तो तुम्हाला समजला का ? |
| उत्तर– | : | होय |
| प्रश्न क्र.३ | : | अभियोग पक्षातर्फे तपासलेले सा.क्र.१ पो.शि. राजु कदम आणि सा.क्र.२ स.पो.नि. प्रमोद दोरकर यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि.१३.०२.२०२६ रोजी रात्री ११:०० ते दि. १४.०२.२०२६ रोजीचे पहाटे ०२:०० वाजेपर्यंत वीर चाफेकर चौक येथे दारु पिवून वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांविरुध्द कारवाई करण्यासाठी नाकाबंदी कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत पो.शि. जगताप हे देखील हजर होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.४ | : | पुढे त्यांच्या साक्षीत असे आले की, नाकाबंदी करत असताना ०१:४५ वाजण्याच्या सुमारास तुम्ही तुमची चारचाकी क्र.एम.एच. १४ के.ए. २५११ ही वेडीवाकडी चालवत घेवून येत असताना त्यांना दिसला. त्यामुळे तुम्हास त्यांनी थांबविले. तुमच्याशी संभाषण करीत असताना, तुमच्या तोंडाचा उग्र वास आला म्हणून स.पो.नि. प्रमोद दोरकर (सा.क्र.२) यांनी उच्छवासक विश्लेषण यंत्राद्वारे तुमच्या श्वासाची चाचणी घेतली असता, तुमच्या श्वासामध्ये ५१.२ एम.जी./१०० मिली इतके अल्कोहोलचे प्रमाण आढळून आले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |

| | | |
|---|---|---|
| उत्तर– | : | |
| प्रश्न क्र.५ | : | पुढे त्यांच्या साक्षीत असे आले की, त्यानंतर पो.शि. पो.शि. राजु कदम (सा.क्र.१) यांनी तुमच्याविरुध्द मो.वा.का.क. १८४, १८५ अन्वये दारु पिवून वाहन चालविल्याबद्दल फिर्याद (नि.क्र.१०/पी–१) दाखल केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.६ | : | साक्षीदार क्र. २ स.पो.नि. प्रमोद दोरकर यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी उच्छवासक विश्लेषण यंत्रामधील अहवाल (नि.क्र.११/पी–२) काढला. पो.शि. पो.शि. राजु कदम (सा.क्र.१) यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. त्यावरुन दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास त्यांनी केला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.७ | : | पुढे त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, गुन्ह्याच्या तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवून घेतली, तुम्हाला समजपत्र (नि.क्र.१२/पी–२) दिले. तसेच त्यांनी उच्छवासक चाचणी यंत्र हाताळण्याचे प्रशिक्षण घेतल्याबाबतची छायांकित प्रत आणि ज्या उच्छवासक चाचणी यंत्रातुन आरोपीची तपासणी केली होती त्याच्या कॅलिब्रेशन प्रमाणपत्राची छायांकित प्रत ही सर्व कागदपत्रे दोषारोपपत्रात सामील केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.८ | : | पुढे त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, गुन्ह्याच्या तपासाअंती तुम्ही तुमच्या ताब्यातील दुचाकी दारु पिवून चालविल्याबाबत सबळ पुरावा आल्याने त्यांनी तुमच्याविरुध्द दोषारोप न्यायालयात दाखल केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.९ | : | वरील साक्षीदार तुमच्याविरुध्द का सांगतात ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |
| प्रश्न क्र.१० | : | तुम्हाला तुमच्या बचावासाठी शपथेवर साक्ष द्यायची आहे का ? |
| उत्तर– | : | खोटे आहे |

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र.११ | : | तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत का ? |
| उत्तर– | : | नाही |
| प्रश्न क्र.१२ | : | तुम्हाला केसबाबत आणखी काही सांगायचे आहे का ? |
| उत्तर– | : | नाही |

......................
(आरोपीची सही)
दिः ३०.०७.२०२६

समक्ष
(एस. बी. पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, वरील तपासणी माझे समक्ष ऐकण्यात व घेण्यात आली असून आरोपीने दिलेला जबाब पुर्णपणे सत्यतेने नोंदविण्यात आला आहे.

(एस. बी. पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

पुणे.
दि. ३०.०७.२०२६